# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०२४

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) २२९३३ (१६-०७-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय दर्जेदार अधिकारी निवडण्याची जबाबदारी असणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरतीचा निर्णय घेण्यात आला असून, आयोगाच्या अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसल्याने त्यांच्यातील अनागोंदी कारभारामुळे आयोगाच्या गोपनीयता, संवेदनशीलता, पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊन परीक्षा, निकाल व अभ्यासक्रम यावर परिणाम होत असल्याने परीक्षा, निकाल प्रलंबित असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये परीक्षा नियंत्रक असे कोणतेही पद मंजूर नसताना बेकायदेशीर आदेशाद्वारे आयोगाच्या अध्यक्षांच्या मान्यतेविना एका अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येऊन या अधिकाऱ्याच्या पदोन्नतीचे आदेश सहा महिन्यांसाठी असताना सहा महिने पूर्ण होऊनही हे अधिकारी आयोगातच काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कामकाज हे संवेदनशील व गोपनीय स्वरूपाचे असतानाही येथे कायमस्वरूपी अधिकारी व कर्मचारी असणे अपेक्षित असतानाही आयोगाच्या कार्यालयात सह सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी व लिपिक टंकलेखक ही पदे प्रतिनियुक्तीने तसेच कंत्राटी तत्वावर भरण्यात आल्यामुळे गोपनीयता व कायदेशीर घटनांचा भंग केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या निकालावर कोणताही परिणाम न करता सरळसेवेने आयोगातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची सर्व रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०९-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दिनांक १६ मे, २०१४ रोजीच्या अधिसूचनेन्वये प्रसिध्द कार्यनियमावली मधील नियम क्रमांक २ च्या पोटनियम ४ मध्ये विहित केल्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विनंतीनुसार परीक्षा नियंत्रक पदावर संबंधित अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली असून सदर प्रतिनियुक्तीस शासन मान्यतेने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग तसेच सार्वजनिक आरोग्य विभागतील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करुन अवर सचिव/ कक्ष अधिकारी – १ पद, सहायक कक्ष अधिकारी – २ पदे, व लिपिक टंकलेखक – १ पद अशी ४ पदे ३ वर्षाच्या कालावधीकरीता प्रतीनियुक्तीने भरण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

आयोगाच्या कार्यालयातील लिपिक-टंकलेखकाची ४५ रिक्त पदे आयोगामार्फत २०२४ च्या जाहिरातीमधून भरण्यास साधारणत: दीड ते दोन वर्षाचा कालावधी लागणार असल्याने आयोगाच्या प्रस्तावानुसार अपुऱ्या मनुष्यबळाअभावी आयोगाच्या कार्यालयीन कामकाजावर परिणाम होवू नये म्हणून नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंतच लिपिक टंकलेखकाची सदर पदे बाह्य यंत्रणेमार्फत भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आकृतीबंधातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत आयोगाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फतच्या भरती प्रक्रीयेत पसंतीक्रम नियम डावलल्याबाबत

**(२) २२९३४ (१६-०७-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेत आयोगाने संयुक्त परीक्षा गट-ब परीक्षेतील चारही संवर्गांचा निकाल एकत्र जाहीर न करता आणि उमेदवारांकडून कुठल्याही पदासाठी पसंतीक्रम न मागता थेट गुणवत्ता यादी जाहीर करुन भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टींग आऊट) पर्याय दिला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एका व्यक्तीची एका किंवा बहुसंवर्गामध्ये एकापेक्षा अधिक पदावर निवड झाल्यास ४८ तासांच्या आत एक पद निवडण्याची मुभा देण्याबाबत व अन्य पदांवरील निवड रद्द करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक उमेदवार एकापेक्षा अधिक पदावर निवड झाल्यानंतर देखील एकाच ठिकाणी नियुक्त होऊ शकत असल्याने बाकीची जागा रिक्त राहत असल्याने अन्य परीक्षार्थींचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या बहुसंवर्गीय किंवा एक संवर्गाच्या भरती प्रक्रियेमध्ये अनेक पदावर निवड झालेल्या उमेदवाराला भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या पर्यायामुळे ऑप्टिंग आऊट साठी सात दिवसांचा अवधी मिळत असल्याने अशा उमेदवारांकडून प्रतिक्षा यादीतील उमेदवारांकडून आर्थिक देवाणघेवाण केल्याचे आयोगाच्या देखील वेळोवेळी निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ऑप्टींग आऊट विकल्पामुळे संभ्रम निर्माण होऊन आर्थिक गैरव्यवहार वाढीस लागले असल्यामुळे या पध्दतीच्या नियमावलीत बदल करण्याबाबत आयोगास शासनस्तरावरून मार्गदर्शन /निर्देश देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०९-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा योजनेतील तरतूदीनुसार संवर्गनिहाय निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. संवर्गनिहाय निकाल जाहीर करण्यात आल्यामुळे पसंतीक्रम मागविण्यात आलेला नाही व थेट ऑप्टींग आऊट चा पर्याय देण्यात आला.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

प्रतिक्षायादीतून उमेदवारांची मागणी होत असते. त्यामुळे रिक्त पदे १ वर्षाच्या आत भरण्यात येतात.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव शहर परिसरात प्लास्टिकचा पुनर्वापर करणाऱ्या नवीन उद्योगांना प्रोत्साहन देण्याबाबत

**(३) २३०५२ (१२-०६-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्लास्टिक बंदी असूनही जळगाव शहराच्या परिसरात प्लास्टिकचे पुनर्वापर करणाऱ्या उद्योगांची संख्या वाढलेली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्योगांमुळे प्लास्टिकद्वारे होणारे प्रदूषण नियंत्रणात येत असून रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहे, प्लास्टिक पुनर्वापर उद्योगाला शासनाने प्रोत्साहन देण्याबाबतचे धोरण आणावे अशी मागणी या परिसरातून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरात भुसावळ जंक्शन असल्यामुळे देशातील अनेक शहरांशी जोडले असून रोजगार निर्मितीसाठी येथील प्लास्टिक पुनर्वापर उद्योगास प्रोत्साहन तसेच मान्यता देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

नवीन उद्योगांना चालना मिळण्याकरीता उद्योग संचालनालयामार्फत सामुहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत उद्योग घटकांना मुद्रांक शुल्क सवलत, विजदर अनुदान, व्याज परतावा, विद्युत शुल्क माफी, औद्योगिक प्रोत्साहन याद्वारे देण्यात येत आहे. तसेच महिला उद्योजकांकरीता प्रचलीत सामुहिक प्रोत्साहन योजनेतंर्गत १० टक्के अतिरिक्त प्रोत्हसाने व २० ते २५ टक्के किंवा जास्तीत जास्त ५० लाख इतके कॅपीटल अनुदान देण्यात येते. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत १५ ते ३५ टक्के पर्यंत अनुदान देण्यात येते.

भुसावळ येथे सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३, २०१९ व महिला धोरण अंतर्गत प्लास्टिक रिसायकलींग वर आधारित एकूण ८ उद्योग घटकांना पात्रता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले असून त्यांत १८.२१ कोटी गुंतवणूक व १६९ रोजगार प्राप्त झालेला आहे. सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ अंतर्गत प्लास्टिक रिसायकलींग वर आधारित १० सुक्ष्म व लघु उद्योग घटकांना जमीन खरेदी/बँक मुदत कर्जकरीता मुद्रांक शुल्क सवलत देण्यात आली असून त्यातून ९८ रोजगार व १७.५४ कोटी गुंतवणूक होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वातावरणीय बदलांवरील दिर्घकालीन उपाययोजनांसाठी विशेष मंत्रालयाची स्थापना करण्याबाबत

**(४) २३१३९ (३०-०५-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तापमानात गत काही वर्षात कमालीची विसंगती दिसून येत असून हे तापमान सामन्य तापमानापेक्षा जास्त नोंदविले जात असून तीव्र गतीने बदलणाऱ्या हवामानावर दीर्घकालीन उपायांसाठी राज्यात विशेष मंत्रालय स्थापन करण्याची गरज निर्माण झाली असल्याचे मत हवामान क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हवामानाच्या नियोजनासाठी उष्णतेच्या लाटा किंवा शीतलहरीवर काम करणे अपेक्षित नसून, वातावरण विज्ञान व दीर्घकालीन दृष्टीकोन ठेऊन दीर्घकालीन धोरणे आखायची असतील तर मनुष्यबळ, आर्थिक नियोजन, हवामान तज्ञ यासारखे अभ्यास करणारे मनुष्यबळ असण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हवामान बदलाचा राज्यातील कृषी, ऊर्जा, आरोग्य, जल आणि आर्थिक विकासावर दूरगामी परिणाम होत कृषी क्षेत्रातील अन्न निर्मितीसह राज्यातील जैवविविधतेवर याचा अधिक प्रभाव पडत असून सदर प्रकरणी हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(४) असल्यास, राज्यात मोठ्या प्रमाणात होत असणारे वातावरणीय बदल पाहता राज्यातील हवामानाच्या नियोजनासाठी विशेष मंत्रालयाची स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

गेल्या काही वर्षात तीव्र झालेल्या हवामान बदलाच्या आव्हानाचे महत्व ओळखून त्यावर उपाययोजना करण्यासाठी पर्यावरण विभागा मार्फत विविध उपाय योजना राबविण्यात येत आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यात वातावरणीय बदलाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी व त्याच्या दुष्परिणामांचा प्रभाव कमी करण्याच्या दृष्टीने सन २०१४ मध्ये महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र राज्य अनुकूलन व कृती आराखडा (SAPCC) तयार केला आहे. ज्यात विभागनिहाय अनुकूलन उपाययोजना/शिफारशी यांचा समावेश असून संबंधित विभागांद्वारे त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपाययोजनांमध्ये कृषी क्षेत्रात बदलत्या वातावरणास अनुरुप पीक पध्दती, तंत्रज्ञानाबाबत माहिती उपलब्ध करुन देणे, सुक्ष्म जलसिंचनास प्रोत्साहन देणे, सौर ऊर्जा/नवन ऊर्जा वापरासाठी शेतकऱ्यांना उद्युक्त करुन शेतीतील उत्पादकता वाढवणे, मत्स्यव्यवसायाला प्रोत्साहन देणे इत्यादी उपायायोजनांचा समावेश आहे. राज्यातील संवेदनशील जिल्हयांसाठी विशेष आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा विकसीत करणे व राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन धोरणामध्ये वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने सुधारणा करणे या शिफारशीही त्यात सुचवण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्याचे "वातावरणीय अनुकुलन" धोरण शासन निर्णय दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सदर कृती आराखडा केंद्रीय पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल विभाग यांच्याकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आला असून लवकरच त्याची राज्यात अंमलबजावणी करण्यात येईल.

केंद्रिय पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालयाच्या नव्या निर्देशानुसार उपरोक्त कृती आराखड्याचे अद्ययावतीकरण करण्यात आले असून, त्यामध्ये कृषी, जलसंधारण, जलसंपदा, सार्वजनिक आरोग्य, पर्यटन व आदिवासी विकास या क्षेत्रांकरीता वातावरणीय बदल अनुकूल (Climate Change Adaptation) तसेच ऊर्जा, उद्योग, परिवहन व वने या क्षेत्रांकरीता वातावरणीय बदल शमन(Climate Change Mitigation) उपाययोजना व कृती सुचवण्यात आल्या आहेत.

यामध्ये कृषी क्षेत्राकरीता ग्रामीण भागात अन्नधान्याचे, विशेषत: भाजीपाला व फळे यांचे नुकसान टाळण्यासाठी, मोठ्या प्रमाणावर शीतगृहे (cold storages) उभी करणे, शेतकऱ्यांना आंतरपीक घेण्यासाठी प्रोत्साहित करणे, हवामानातील बदलांच्या धोक्यांबाबत शेतकऱ्यांना पूर्वसूचना देणे, हवामान बदलाला तोंड देण्यास सक्षम असणाऱ्या वाणांचा विकास करणे, पाण्याचा कार्यक्षम वापर करणे व अन्नप्रक्रिया उद्योगांना चालना देणे या उपायोजना सुचवण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत उत्तम नियोजन करण्यासाठी आपत्ती पूर्वसुचना यंत्रणेचे नूतनीकरण करणे, पूर पूर्वसुचनेसाठी ऑनलाइन डॅशबोर्ड तयार करणे, तालुका पातळीवर आपत्तीचे धोके कमी करण्यासाठी तज्ञांकडून नवीन धोरण तयार करुन घेणे, राज्यातील हॅम रेडियो ऑपरेटर्सची संख्या वाढवणे, विकास आराखड्यांत अद्ययावत कृती आराखड्यात सुचवण्यात आल्या आहेत.

याशिवाय बांबू लागवडीस शेतकऱ्यांना उद्युक्त करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली "पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स" गठित करण्यात आला आहे. बांबूचे रोप झपाटयाने वाढणारे, कमी पाण्यात येणारे व इतर झाडांच्या तुलनेत अधिक कार्बन शोषून घेणारे असल्यामुळे राज्यातील पडीक जमिनीवर, नदीकाठांवर, धरण क्षेत्रात, रस्त्यांच्या कडेने तसेच सामुदायिक वनहक्क जमिनींवर तसेच खासगी जमिनींवर मोठ्या प्रमाणात बांबू लागवड करण्यात येणार आहे.

(४) सदर कृती आराखडा व धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागांतर्गत दिनांक ०९ ऑगस्ट, २०२३ च्या शासन निर्णयान्वये "राज्य वातावरण कृती कक्षाची" स्थापना करण्यात आलेली आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व राज्य वातावरण कृती कक्षाद्वारे राज्यातील विविध विभागांतर्गत समन्वय साधून विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील चेंबूर ते संत गाडगे महाराज चौक या मोनो रेल्वे मार्गिकेच्या संचालन आणि देखभालीसाठी खाजगी कंत्राटदाराची नियुक्ती प्रक्रिया रद्द करण्याबाबत

**(५) २३१९७ (१८-०६-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर ते संत गाडगे महाराज चौक या मोनो रेल्वे मार्गिकेच्या संचालन आणि देखभालीसाठी खाजगी कंत्राटदाराची नियुक्ती केली जाणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोनो मार्गिका आर्थिकदृष्ट्या तोट्यात असताना या नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, नवीन कंत्राटदाराची नियुक्ती न करता ही निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करीत आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सद्य:स्थितीत मोनो रेल चे व्यवस्थापन व संचलन MMMOCL यांचे मार्फत करण्यात येत आहे. मोनोरेलची देखभाल व दुरुस्ती अधिक कार्यक्षम व फायदेशीर पध्दतीने चालविणे अपेक्षित असल्यामुळे नविन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

---

## खारघर (नवी मुंबई) येथील भगवती डेव्हलपर्सनी नियमबाह्य बांधकाम केल्याबाबत

**(६) २३२३० (२२-०५-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील खारघरमधील भगवती ग्रीन्स-३ टॉवरला एफएसआय १.५ लागू असताना काही वर्षांनी ३.५ एफएसआय येणार हे गृहीत धरूनच भगवती डेव्हलपर्सनी जास्तीचे बेकायदेशीर बांधकाम केले असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टॉवरमध्ये १४ हजार चौ. फुटांचे नियमबाह्य जास्तीचे बांधकाम करण्यात आले आणि सिडकोच्या मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांनी दिलेला यासंदर्भातील अहवाल सिडकोच्या नगररचना विभागाने कारवाई न करता तसाच ठेवला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सदर १४ हजार चौरस फुटांच्या बेकायदा बांधकामाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०६-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मे.भगवती डेव्हलपर्स यांना निवासी व वाणिज्य वापरासाठी नवी मुंबई, खारघर, सेक्टर-२३, भूखंड क्र.३ वाटप करण्यात आला होता. सदर भूखंडाचा भाडेपट्टा करारनामा दिनांक २६/१०/२०१६ रोजी करण्यात आला आहे.

सदर भूखंडाच्या मूळ चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) व्यतिरिक्त प्रिमियम एफ.एस.आय. नुसार ३३६०.५६ चौ.मी. व ॲन्सीलरी एफ.एस.आय. २२२६.९० करीता सुमारे रुपये २.७७ कोटी अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क आकारुन दिनांक ३१/१२/२०२१ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सिडको महामंडळाच्या धोरणानुसार सदर बांधकामास ०२ वर्षाचा कालावधी देण्यात आला होता.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पर्यावरणीय प्रदुषणास आळा घालण्याकरीता प्लास्टीक कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट व पुनर्प्रक्रिया करण्याबाबत

**(७) २३३६२ (३०-०५-२०२४) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्लास्टिक पॅकेजिंग उत्पादक, आयातदार, ब्रँड मालक, प्लास्टिक कचरा पुनर्प्रक्रिया उद्योगधंदे करणाऱ्या व्यावसायिकांनी प्लास्टिकचे किती उत्पादन केले, बाजारपेठेत किती प्लास्टिक दिले तसेच किती प्लास्टिकची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावली व पुनर्प्रक्रिया केली याबाबत माहिती देणे बंधनकारक करण्यात आले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रीय आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पोर्टलवर सदर नोंदणी करताना शास्त्रोक्त पध्दतीने माहिती दिली जाईल याबाबत शासन स्तरावर कोणती पडताळणी प्रक्रिया केली जाते,
(३) असल्यास, पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करून उत्पादन केल्यास नुकसान भरपाईसह उद्योगधंदे बंद करण्याचा इशारा प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) होय.

(२) उत्पादक, आयतदार, ब्रँड-मालक (PIBOs) व प्लास्टिक कचरा पुनर्प्रक्रिया उद्योग (PWPs) यांना अर्ज सुलभरित्या भरण्याकरीता केंद्रीकृत ईपीआर पोर्टलवर मार्गदर्शक दस्तऐवज प्रकाशित केली आहेत. संबंधित ईपीआर पोर्टलवर त्यानुसार अर्जाची माहिती योग्य त्या दस्तावेजांसमवेत प्रस्तुत करणे अर्जदारास अनिवार्य आहे. अर्ज सादर केल्यावर दिलेली माहितीची पडताळणी केली जाते. तसेच प्लास्टिक कचरा पुनर्प्रक्रिया उद्योग यांची पडताळणी करण्याकरीता केंद्रीकृती ऑनलाईन तपासणी सूची संबंधित क्षेत्राच्या अधिकाऱ्यामार्फत प्रस्तुत करण्यात येते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) स्थानिक स्वराज्य संस्था, गृह (पोलीस) विभाग तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी आस्थानांना भेटी देण्यात येतात व एकल वापर प्लास्टिकच्या वस्तुंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हातळणी आणि साठवणूक करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येते. सन २०२३-२४ मध्ये एकूण १,७८,७५० आस्थानांना भेटी देण्यात आल्या त्यापैकी ८३३१ आस्थापनेवर कारवाई करण्यात आली व रुपये ४.५ कोटी इतका दंड गोळा करण्यात आला तसेच १९१ टन प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आयुक्तांनी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती केल्याबाबत

**(८) २३६११ (०४-०७-२०२४) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आयुक्तांनी कोणतीही मान्यता न घेता सेवानिवृत्त झालेल्या पाच अधिकाऱ्यांची एमएमआरडीएमध्ये विशेष कार्य अधिकारी (OSD) म्हणून नियुक्ती केल्याची बाब माहितीच्या अधिकारातून माहे जानेवारी, २०२४ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची मान्यतेशिवाय नियुक्ती करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची विशेष कार्य अधिकारी पदावर मान्यतेशिवाय नियुक्ती करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०८-२०२४) :** (१), (२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विविध पायाभूत सुविधा प्रकल्प, मेट्रो प्रकल्पांची कामे सद्य:स्थितीत सुरु आहेत. सदर कामांसाठी अनुभवी व तांत्रिक अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. यासाठी प्राधिकरणाने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये व दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकातील तरतुदीनुसार केली आहे.

---

## माहीम (मुंबई) येथील समुद्रात पाच व्यक्ती बुडून मृत्यू झाल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(९) २३६३६ (१८-०६-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहीम (मुंबई) येथील समुद्रात धुळवडीच्या दिवशी पाच जण बुडाले असून त्यापैकी एकाचा मृत्यू झाला व एक बेपत्ता झाला असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्सोवा येथील सागरकुटीर चौपाटीवर एका व्यक्तीचा समुद्रात बुडून मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समुद्र किनारी जीवरक्षक (लाईफगार्ड) तैनात करण्याबाबत तसेच मृतांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत गिरगाव, दादर, जुहु, वर्सोवा, अक्सा आणि गोराई या सहा चौपाट्यांवर जीवरक्षकांची यंत्रणा पुरविली जाते. सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कायमस्वरुपी ११ जीवरक्षक (लाईफगार्ड) तसेच मे. दृष्टी लाईफसेविंग या कंत्राटदार संस्थेचे ९३ जीवरक्षक (लाईफगार्ड) कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील खाजगी ट्रॅव्हल्सच्या गाड्या सदोष असल्याबाबत

**(१०) २३६४६ (१८-०६-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा (पूर्व) आरटीओने खाजगी ट्रॅव्हल्सच्या १,२१८ बसगाड्यांची तपासणी केली असता त्यातील ४८ टक्के म्हणजे ५९८ बसगाड्या सदोष असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहन चालविण्याचा परवाना नसणे, बिल्ला न लावणे, योग्यता प्रमाणपत्र नसणे, वायू प्रदूषण प्रमाणपत्र वैध नसणे, क्षमतेपेक्षा जास्त माल व प्रवासी वाहतूक करणे, विनापरवाना वाहतूक करणे, मर्यादेपेक्षा जास्त क्षमतेने वाहन चालविणे इ. बाबी वडाळा आरटीओ कार्यालयाच्या निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सच्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे काय, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून वाहनचालक व मालक यांनी वाहतूक नियमांचे अचूक पालन करावे, तसेच मोटार वाहन करांचा भरणा नियमित भरुन दंडात्मक कारवाई टाळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, अशा प्रकारच्या सदोष वाहनांमुळे प्रवाशांचा जीव धोक्यात येत असून ही अत्यंत चिंताजनक बाब आहे, या सदोष खाजगी ट्रॅव्हल्सच्या बसेसवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०६-२०२४) :** (१) व (२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) कार्यालयातील वायुवेग पथकांनी एप्रिल, २०२३ ते फेब्रुवारी, २०२४ या कालावधीमध्ये १२१८ खाजगी बसेसची तपासणी केली आहे. सदर तपासणीअंतर्गत बसेसची तपासणी करताना विनापरवाना अथवा परवान्याच्या अटींचा भंग करुन वाहन चालविणे, प्रवाशी बसेसमधून अवैधरित्या मालवाहतूक करणे, योग्यता प्रमाणपत्र नसणे, वाहनांमध्ये बेकायदेशीर केलेली फेरबदल, टप्पा वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक, अग्निशमन यंत्रणा, रिफ्लेक्टर, टेल लाईट, इत्यादी बाबींची तपासणी करण्यात आली. यामध्ये ३३९ वाहने दोषी आढळलेली आहेत.
(३) व (४) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) कार्यालयाच्या वायुवेग पथकाने तपासणी मोहिमे अंतर्गत केलेल्या कारवाईचा तपशील खालीलप्रमाणे :-

माहे एप्रिल, २०२३ ते फेब्रुवारी, २०२४

| वाहनाचा प्रकार | तपासलेली वाहने | दोषी वाहने | एकूण वसुली (रुपये लाख) |
|---|---|---|---|
| खाजगी बसेस | १२१८ | ३३९ | ४२.३६ |

दोषी वाहनांवर मोटार वाहन अधिनियम आणि तद्अनुषंगिक नियमानुसार प्रादेशिक परिवहन विभागाकडून कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्याच्या भूगर्भात आढळून आलेले मिथेन वायुचे साठे काढण्याची प्रक्रिया पुनर्जिवित करण्याबाबत

**(११) २३६९२ (२२-०५-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयाने सन २०१६-२०१७ मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणानुसार बल्लारपूर, गोंडपिपरी, राजुरा, कोरपना, भद्रावती आणि वरोरा तालुक्यातील (जि.चंद्रपूर) अनेक गावात भुगर्भात ९४.४ मिलियन मॅट्रिक टन मिथेनचे साठे आढळुन आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यावसायिकदृष्ट्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये ब्लॉक्स पाडून त्याचे लिलाव करण्यात येणार आहेत काय तसेच त्यानुसार मिथेनच्या साठ्यामधुन आर्थिक उत्पन्नाचे स्रोत मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयाशी शासनाकडून विचारविनिमय व वाटाघाटी करण्यात येणार आहेत काय,
(३) असल्यास, कोल बेडेड मिथेन वायू स्वच्छ उर्जेचे एक मोठे स्रोत असून वायूचे असाधारण महत्व लक्षात घेता राज्यासह चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासासाठी उपयोग होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१), (२) व (३) भूगर्भातील कोल बेड मिथेन बाबतचे पूर्वेक्षण/सर्वेक्षण करण्याचे कुठलेही अधिकार राज्य शासनाच्या खनिकर्म विभागाच्या अखत्यारित असलेल्या भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयास नाहीत.

खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियमाच्या अनुसूची-अे नुसार हायड्रोकार्बन/ऊर्जा निर्माण करणाऱ्या सर्वच खनिजांचे विकसन व विनियमन करण्याचे अधिकार केंद्र शासनाचे अखत्यारित येत असून, यामध्ये मिथेन या नैसर्गिक वायुचा देखील समावेश होतो.

यासंदर्भात पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून प्राप्त अभिप्रायानुसार, केंद्र शासनाने १० ऑक्टोबर, २०२२ रोजी देशातील ०७ राज्यांतील १६ कोल बेड मिथेनचे एकूण ५८१७ चौ.किमी क्षेत्र आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोलीच्या माध्यमातून Open Acreage Licensing Policy करीता "Special CBM Bid Round-२०२२" (SCBM-२२)आयोजित केले होते.

यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील दोन क्षेत्रांचा देखील (PG-ONHP(CBM)-२०२२/१- ३३१चौ.किमी आणि (PG-ONHP (CBM)-२०२२/२-७०९ चौ.किमी.) समावेश आहे. यासंदर्भातील पुढील कार्यवाही केंद्र शासनाच्या पातळीवर सुरु आहे.

ज्यावेळी सदर खनिजाचे उत्खनन सुरु होईल, त्यावेळी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू नियम, १९५९ मधील नियमानुसार संबंधित खाणक्षेत्र धारकाने राज्य शासनाकडे रॉयल्टीपोटी महसूल जमा करावयाचा आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यसेवा परीक्षा २०२२ च्या मुलाखतीमध्ये गुण वाढवून देण्यासाठी उमेदवारांना फोनद्वारे संपर्क केल्याबाबत

**(१२) २३८३० (१६-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२२ राज्यसेवा परीक्षेच्या मुलाखतीमध्ये गुण वाढवून देण्यासाठी उमेदवारांना फोनद्वारे संपर्क केल्याची तक्रार लोकसेवा आयोगाकडे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या उमेदवारांच्या संघटनेने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने आढळून आलेल्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०९-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

स्टुडंट राईट असोसिएशन या संघटनेची दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजीच्या पत्रान्वये केलेली "आयोगातील सदस्यांचे नाव घेऊन निनावी कॉलद्वारे मुलाखतीमध्ये गुण वाढवून देण्याबाबत" या विषयाची तक्रार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे प्राप्त झाली आहे.
(२) व (३) उपरोक्त प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक १३ मे, २०२४ रोजीच्या पत्रान्वये पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना सदर निवेदनाच्या अनुषंगाने त्वरीत कायदेशीर कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीबाबत आयोगास अवगत करण्याबाबत कळविले आहे.

---

## छत्रपती संभाजीनगर शहराच्या पाणीपुरवठा योजनेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१३) २३८९७ (३०-०५-२०२४) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी अमृत-२ योजनेंतर्गत २७४०.७५ कोटी रकमेच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली परंतु निधी अभावी सदरहू योजनेची कामे संथगतीने सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने निधी उपलब्धतेकरीता शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार केला असून, निधी अभावी सदर प्रकल्पाच्या गतीवर परिणाम होवू नये यासाठी राज्य शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाकडून आदेश देवूनही त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन सदरहू योजनेची कामे स्वहिश्श्यातून करण्याबाबत महानगरपालिकेस शासनाकडून कळविण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर शहरातील पाणीपुरवठा योजना, अपुरी वितरण व्यवस्था व साठवण व्यवस्था तसेच वाढती लोकसंख्या पाहता नागरिकांना मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने महानगरपालिकेची आर्थिक स्थिती योजनेच्या आकृतीबंधानुसार स्वहिस्सा उभारण्यास सक्षम नसल्याने भविष्यात पाणीपुरवठा योजनेअभावी निर्माण होणारी टंचाई लक्षात घेता महानगरपालिकेचा स्वहिस्सा राज्य शासनामार्फत विशेष बाब म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत व मंजूर वित्तीय आकृतीबंधानुसार सदरहू योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत छत्रपती संभाजीनगर शहराच्या रुपये २७४०.७५ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पासाठी आजमितीस केंद्र व राज्य हिश्श्यापोटी रुपये १४२४.१७५ कोटी निधी वितरित करण्यात आलेला असून त्यापैकी रुपये १३६८.८२ कोटी निधी सदर प्रकल्पावर आतापर्यंत खर्च झाला असून प्रकल्पाची भौतिक प्रगती ६५ टक्के झालेली आहे.

(२) कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वहिश्याचा निधी उभारणे शक्य होत नाही त्यांना शासनाकडून कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक कार्यवाही सुरू आहे. त्यास अनुसरून मा.उच्च न्यायालयात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी महानगरपालिकेचा स्व-हिस्सा उभारण्यासाठी शासनाकडून कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याचे मा.उच्च न्यायालयास कळविले आहे.

(३) संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत सद्य:स्थितीस सन १९७५ व १९९१ साली कार्यान्वित झालेल्या पाणीपुरवठा योजनांद्वारे शहरास पाणीपुरवठा करण्यात येतो. शहरातील पाणीपुरवठ्याचे टप्पेनिहाय नियोजन करून शहरातील काही भागात ४ दिवसाआड व दूरस्थ तसेच उंचावरील काही भागाला ६ ते ७ दिवसआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच, अमृत २.० अंतर्गत शहरातील पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम सद्य:स्थितीस प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार सदर प्रकल्पासाठी केंद्र व राज्य हिश्श्यापोटी रुपये १९१८.५३ कोटी निधी अनुज्ञेय असून प्रकल्पाच्या प्रगतीनुसार आजमितीस केंद्र व राज्य हिश्श्यापोटी रुपये १४२४.१७५ कोटी निधी प्रकल्पासाठी वितरित करण्यात आलेला आहे.

तसेच, सदर प्रकल्पासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या स्व-हिस्सा उभारण्यासाठी कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

---

## मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कोरोना काळात वातानुकूलीत रुग्णवाहिकेसाठी नियमबाह्य दराने ठेका दिल्याने कोट्यवधी रकमेचा अपहार झाल्याबाबत

**(१४) २३९३३ (२९-०६-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात शासनाने रुग्णवाहिकेचे दर निश्चित करताना भाडे व प्रवासाचे अंतर यांचे मंजूर केलेले दराऐवजी मंजूर नसलेल्या दरांनी आयसीयू वा वातानुकूलित रुग्णवाहिका भाड्याने देऊन ठेकेदारांना कोट्यवधींचा नफा मिळवून देणाऱ्या मीरा-भाईंदर महानगरपालिकेने शहर लहान असूनसुद्धा प्रत्येक फेऱ्यास किमान १० कि.मी. प्रमाणे भाडे दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने निविदा न काढताच ठेकेदाराच्या मर्जीप्रमाणे ठेका दिल्याने कोट्यवधी रकमेचा अपहार झाल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना काळात रुग्णांची ने-आण करण्यासाठी आयसीयू असलेली वातानुकूलित रुग्णवाहिका भाड्याने मिळावी म्हणुन सौरभ अग्रवाल यांच्या बरकत कॉन्ट्रॅक्टर्स कंपनीने दिनांक ०२ जुलै, २०२० रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस पत्र दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या समितीने दिनांक १९ जून, २०२० रोजी आयसीयू रुग्णवाहिकेसाठी भाडे निश्चित केलेले असताना मिरा-भाईंदर प्रशासनाने प्रत्येक फेऱ्यात १० कि.मी. प्रमाणे निविदा न काढता ठेकेदाराच्या मर्जीप्रमाणे तसेच दिलेल्या पत्रानुसार एका दिवसाचा ठेका देण्यात येऊन सुमारे ११ महिन्यांचे रुपये ४ कोटी ९८ लाख एवढी रक्कम नियमबाह्य दराने मिरा-भाईंदर महानगरपालिकेत अदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) व (२) कोव्हीड-१९ कालावधीमध्ये रूग्णवाहीका तातडीने उपलब्ध करणे गरजेचे होते. सदर कालावधीमध्ये शासकीय दराने रूग्णवाहिका पुरवठा करण्यास पुरवठादार तयार नसल्याने त्यावेळी उपलब्ध पुरवठादाराने दिलेला दराचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(३)(क) व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ यामधील तरतूदीनुसार प्राप्त अधिकारान्वये आयुक्तांमार्फत तातडीची बाब म्हणून स्विकारण्यात आला आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) कोव्हीड-१९ च्या परिस्थितीमध्ये रूग्णवाहिका तातडीने उपलब्ध करण्याची आवश्यकता होती. सदर कालावधीमध्ये अन्य कोणही पुरवठादार शासकीय दरामध्ये रूग्णवाहिका पुरवठा करण्यास तयार नव्हते. त्यामुळे मे. बरकत कॉन्ट्रक्टर्स यांनी रूग्णवाहिका भाड्याने पुरवठा करण्यासाठी दिलेला दराचा प्रस्ताव स्विकारून त्यांच्याकडून रूग्णवाहिका भाडे तत्वावर घेण्यात आल्या.

- दिनांक ०४/०७/२०२० ते दिनांक ३१/०१/२०२१ या कालावधीतील देयके पुरवठादारास कार्यादेशातील दराने अदा केलेली आहेत. तर दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ०८/०६/२०२१ या कालावधीची देयके ही मुंबई महानगर क्षेत्र प्राधिकरण यांनी निश्चित केलेल्या दराने अदा केलेली आहेत.
- रूग्णवाहिका भाड्याने घेतलेला निर्णय हा कोव्हीड-१९ काळातील परिस्थितीनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(३)(क) व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ यामधील तरतूदीनुसार प्राप्त अधिकारान्वये आयुक्तांमार्फत घेतलेला निर्णय आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माहुल (मुंबई) येथील संक्रमण शिबिरातील भाडेकरूंच्या मागण्यांबाबत

**(१५) २४००२ (१४-०६-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगाव (ताडवाडी) येथील बीआयटी चाळीतील २२२० भाडेकरूंना चेंबूर माहूल येथील संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्यात आले असून माहूलमधील प्रदूषणामुळे भाडेकरूंच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीआयटी चाळीतील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पामुळे त्यांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागत असून प्रदुषणामुळे माझगावमध्ये किंवा या परिसरातील २ कि.मी. च्या परिसरात संक्रमण शिबीर उपलब्ध करून द्यावे अशी मागणी भाडेकरूंनी केली असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने भाडेकरुंना २ कि.मी. च्या परिसरात संक्रमण शिबिर उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबईतील माझगाव (ताडवाडी) येथील क्र.१ ते १६ बीआयटी चाळ मधील १३०८ भाडेकरुंपैकी धोकादायक इमारती घोषीत करण्यात आलेल्या ३२० भाडेकरुपैकी १२५ भाडेकरुनां ताडवाडी संक्रमण शिबीरात व उर्वरित १९५ भाडेकरुना माहुल, चेबुर येथे स्थलातरीत करण्यात आले आहे. माहूल, चेंबूर परिसरातील माहूल एसआरए मनपा दवाखाना व माहूल गाव मनपा दवाखाना येथे दाखल रुग्णांच्या सन २०२२ ते २०२४ या कालावधीतील आकडेवारीनुसार दमा व क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (COPD) सारखे श्वसनाचे गंभीर आजारांची वाढ रुग्णांमध्ये दिसून येत नाही. महानगरपालिकेद्वारे माहुल येथील प्रदूषणामुळे आरोग्यावर होणाऱ्या गंभीर परिणामांकरीता टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायंन्स यांच्याकडून अहवाल प्राप्त करुन घेण्यात येत आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सद्य:स्थितीत ताडवाडी किंवा त्यांच्या २ कि.मी. परिसरात प्रकल्पग्रस्तांकरीता सदनिका अथवा संक्रमण शिबीर उपलब्ध नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे येणाऱ्या नागरिकांना बस स्थानकावर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१६) २४०५६ (१७-०६-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीक्षेत्र अक्कलकोट (जि.सोलापूर) येथे स्वामी दर्शनासाठी बाहेरगावचे हजारो भाविक आणि स्थानिक नागरिक येत असतात, रंगभवन व पाण्याची टाकी ह्या बस स्थानकांवर भर उन्हात बसची प्रतिक्षा करत उभे असतात, परंतु लाखो रुपयांचे उत्पन्न एसटी महामंडळाला प्राप्त होऊनही तेथे शौचालय, पाणी, सुरक्षा इत्यादी सुविधांचा अभाव असून सदर सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्याची मागणी नागरिकांकडून होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अक्कलकोट शहरातील दोन्ही बस स्थानके अद्ययावत व सुसज्ज करून पुरेशा सोयी सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०६-२०२४) :** (१), (२) व (३) सोलापूर शहरातील रंगभवन व पाण्याची टाकी हे बसस्थानक नसून प्रवाशी विनंती थांबा आहेत. सदरचे विनंती थांबा हे महानगरपालिकेच्या शहरातील अंतर्गत रस्त्याच्या लगतच्या फुटपाथवर तात्पुरत्या स्वरुपाचे असून, सदर ठिकाणी रा.प. महामंडळाची कोणतीही जागा उपलब्ध नसल्याने प्रवाशांकरीता सोयीचे व्हावे म्हणुन महामंडळामार्फत वाहतूक नियंत्रण कक्ष उभारण्यात आले आहे.

---

## तारापूर (जि.पालघर) औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१७) २४११४ (१७-०६-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर (जि.पालघर) औद्योगिक क्षेत्र हे प्रदूषणाच्या विळख्यात सापडले असून तारापूर औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यांमधून निघणारा घनकचरा विल्हेवाटीसाठी तळोजा येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनीमध्ये पाठविण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे काय,
(२) असल्यास, या कचऱ्याची वाहनातून विल्हेवाट लावण्याचा खर्च जास्त असल्यामुळे परिसरातील काही कारखाने निर्जन जागी रात्रीच्या अंधारात कचऱ्याची बेकायदेशीर विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करतात तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बंद ठेवण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण कमी करुन पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०६-२०२४) :** (१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उद्योगांना दिलेल्या संमतीपत्रातील अटी शर्ती नुसार तारापूर औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यातुन निर्माण होणारा घनकचरा मुंबई वेस्ट मॅनेजमेंट तळोजा या सयंत्रणेकडे नियमितपणे पाठविणे बंधनकारक आहे.
(२) हे अंशत: खरे आहे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीच्या बाहेरील काही ठिकाणी घनकचरा टाकल्याच्या दोन घटना निदर्शनास आलेल्या आहेत. (१. अज्ञात उद्योग, २. मे. ओशेनिक लॅबोरेटरीज प्रा. लि.,) मे. ओशेनिक लॅबोरेटरीज प्रा. लि., या उद्योगाने आपल्या उद्योगातून निर्माण होणाऱ्या काही राडारोड्या सोबत स्पेंट कार्बनचे देखील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसराबाहेर एका ठिकाणी टाकल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदरहू उद्योगास अंतरीम

निर्देश दिनांक ११/०३/२०२४ रोजी बजावून सदरहू दोन्ही ठिकाणचा घनकचरा उचलून त्याची विल्हेवाट सामुहिक प्रक्रिया व विल्हेवाट सयंत्रणा केंद्र, तळोजा येथे करण्यात आलेली आहे.

उद्योगांनी सांडपाणी प्रक्रियेकरीता उभारलेली सांडपाणी सयंत्रणा नियमीतपणे कार्यान्वित केली जाते. त्यामुळे सांडपाणी प्रक्रिया बंद ठेवण्यात येतात हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेमध्ये जाहिरात फलकाच्या निविदेप्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(१८) २४१४८ (१७-०६-२०२४) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या जाहिरात व परवाने विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी जाहिरात फलक उभारणीच्या निविदेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया राबविताना २८ खुल्या जागांवर जाहिरात फलक उभारण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यारंभ आदेश देताना जाहिरात फलका सोबतप्रकाशित फलक, युनिपोल एलईडी वॉल इ. चा समावेश करुन परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत नाशिक आऊटडोअर ॲडव्हर्टायझेशन वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने आयुक्त नाशिक महानगरपालिका यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबविताना अटी व शर्ती मध्ये बदल करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीमध्ये अनियमितता करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर व निविदाकारावर गुन्हा दाखल करुन नियमबाह्य पध्दतीने देण्यात आलेली कामे पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करुन त्यांचेकडून शासनाच्या निधीची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नाशिक आऊटडोअर ॲडव्हटायझिंग वेल्फेअर असोसिएशन, नाशिक यांच्या तक्रारीनुसार मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) महाराष्ट्र शासन, यांच्या दिनांक २९ जानेवारी, २०२४ रोजीचे निर्देशान्वये अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षेतेखाली उपआयुक्त (प्रशासन) व मुख्य लेखापरिक्षक, मनपा नाशिक यांची चौकशी समिती गठित करण्यात येऊन जाहिरात व परवाने विभागामार्फत संबंधित मक्तेदार यांना दिनांक ०३/०४/२०२४ रोजीच्या नोटीसअन्वये मनपा मालकीच्या खुल्या जागेत एकूण २८ जागांवर परवानगी दिलेल्या ठिकाणावरील आकाश-चिन्ह/जाहिरात फलक/ युनिपोल वगळून उर्वरित इतर सर्व

आकाश-चिन्ह/ जाहिरात फलक/ युनिपोल करीता दिलेली परवानगी रद्द करण्यात आलेबाबत कळविण्यात आले असता मक्तेदार यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.५६६५/२०२४ अन्वये दावा दाखल केला आहे. सदर दाव्याच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिनांक १६/०४/२०२४ रोजी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेच्या दिनांक २७/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मक्तेदारास १५ दिवस मुदत म्हणने मांडण्याकरीता देण्यात आली आहे.
(५) मा.उच्च न्यायालयाचे आदेश /निर्देशान्वये पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

---

## प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) २४२२७ (१७-०६-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीप्रकरणी निर्णय न घेतल्यामुळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी अशा २६ जागांवर अतिरिक्त कार्यभार सोपवून त्याद्वारे कामकाज पार पाडले जात असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार मुंबईतील ७, नागपुर येथे २ व अन्य १७ जिल्ह्यांच्या ठिकाणी प्रत्येकी एक आरटीओच्या अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असून मुंबई येथील परिवहन आयुक्त कार्यालयासह मुंबई मध्य, ठाणे आणि पुणे या चार ठिकाणी (आरटीओ) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रादेशिक परिवहन विभागामध्ये नवीन आकृतिबंध लागू करण्यात आला असून जुनी ४०० पदे व्यपगत करुन ७० टक्के कर्मचाऱ्यांची पदे अपग्रेड झाली, परंतु या आकृतीबंधामुळे अनेक पदे व्यपगत केल्यामुळे एकूण अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संख्येमुळे परिवहन विभागाच्या कर्मचाऱ्यांवर तसेच कार्यक्षमतेवर याचा परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परिवहन कार्यालयातील कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी ही पदे पदोन्नतीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०६-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

तथापि, गृह (परिवहन) विभागाच्या दिनांक १६ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकूण २३ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गात तसेच, एकूण १२ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना उप प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.

(३) गृह (परिवहन) विभागाच्या अखत्यारितील मोटार वाहन विभागाच्या कामकाजाचे संगणक आधारित बदलते स्वरुप विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक २३/०९/२०२२ अन्वये परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, मोटार वाहन विभागातील कामकाजाचे संगणकीकरण झालेले असून एकूण ११५ सेवा संगणकीय झालेल्या आहेत. त्यापैकी ८४ सेवा ऑनलाईन व ३४ सेवा फेसलेस स्वरुपात उपलब्ध आहेत. त्यामुळे मोटार वाहन विभागाच्या कर्मचाऱ्यांवर तसेच कार्यक्षमतेवर परिणाम झालेला नाही.

(४) गृह (परिवहन) विभागाच्या दिनांक १६ मार्च, २०२४ व दिनांक २९ एप्रिल, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकूण १२ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना उप प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच, सहायक मोटार वाहन निरीक्षक या सवर्गातील एकूण ३८ अधिकाऱ्यांना मोटार वाहन निरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आली आहे. सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील स्पर्धा परीक्षा केंद्रे वा शाळा व महाविद्यालयांमध्ये मुलींसाठी सुविधा निर्माण करण्याबाबत

**(२०) २४२२८ (१८-०६-२०२४) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरवर्षी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांमध्ये मुलांइतकेच मुलींचेही प्रमाण असून, सदर परीक्षांच्या अभ्यासाचा ताण व भीती तसेच वाढती स्पर्धा यामुळे ऐन परिक्षेदरम्यान मुलींना मासिक पाळी व इतर अन्य शारिरीक समस्या उद्भवल्यास मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने स्पर्धा परीक्षा केंद्रावर सॅनिटरी नॅपकीन, व्हेंडिग मशीन, स्वच्छतागृह व प्रथमोपचारपेटी इ. सुविधा तसेच प्रत्येक परीक्षा केंद्रांवर मुलींसाठी विशेष कक्ष उपलब्ध नसल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षेची पूर्ण तयारी झालेली असतानाही मासिक पाळी व अन्य शारीरिक समस्या उद्भवल्यास मुलींची मनस्थिती चिंताजनक होऊन मुली परीक्षेचे पेपर सोडविण्यास असमर्थ ठरत असल्याची बाब दिनांक ६ मे, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत विद्यार्थीनींच्या कुटुंबियांकडून तसेच क्षितीज फाऊंडेशन या सामाजिक संस्थेमार्फत शासनाकडे सदर स्पर्धा परीक्षार्थी विद्यार्थिनींकरीता परीक्षा केंद्रावर आरोग्याच्या दृष्टीने सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचे मागणी करणारे निवेदन दिले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्पर्धा परीक्षा केंद्रांवर सॅनिटरी पॅड, व्हेंडिंग व पॅड डिस्पोजल मशीन कार्यान्वित करण्यासह इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.